# विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड – प्रसारण

सुधारित याचिका, यासाठी:

*आर्थिक वर्ष १४–१५ ते आर्थिक वर्ष १५–१६ या कालावधीतील भांडवल खर्च आणि एकूण महसूलाची आवश्यकता (''एआरआर'') याला मंजुर*

दाखल केले

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

## 1. कार्यकारी सारांश

ए.1 प्रस्तावना

विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड (यापुढे याचा उल्लेख 'व्हीआयपीएल' असा केला जाईल) हे एक विशेष उद्देश असलेले साधन आहे आणि रिलायन्स पॉवर लिमिटेड अशा उपकंपनी यांच्या पूर्णपणे मालकीचे आहे. व्हीआयपीएलने महाराष्ट्र राज्यातील नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरी क्षेत्रात 600 (2३००) मेगावॅटचा कोळशावर आधारित ऊर्जा प्रकल्प स्थापन केला आहे. वितरण रिलायन्स इंफ्रास्ट्रक्चर लिमिटेड बरोबर त्यांच्या अधिकृत क्षेत्रातील ग्राहकांची ऊर्जेची गरज पूर्ण करण्यासाठी स्टेशन मधून संपूर्ण 600 मेगावॅटच्या खरेदीकरता (यात यापुढे आरइंफ्रा–डी असा उल्लेख केला जाईल) एका पीपीए वर व्हीआयपीएलने स्वाक्षरी केली आहे.

व्हीआयपीएलने बरोबर पीपीएने स्वाक्षरी केलेल्या पीपीएला मंजूरी मिळण्याकरता 2013 ची केस क्र. 2 ही याचिका आरइंफ्रा–डीने दाखल केली आहे. याच याचिकेत, याचिकेच्या अर्जदाराने व्हीआयपीएलच्या देखील तात्पुरत्या भांडवली खर्चालादेखील मंजूरी देण्याची विनंती केली. सन्माननीय आयोगाने 20 फेब्रुवारी 2013 दिनांकाच्या 2013च्या केस क्र.2मधील आदेशानुसार, युनिट 2 मधून 300 मेगावॅट खरेदी करण्याच्या पीपीएला मान्यता मंजूरी दिली आहे आणि एमआयडीसीने 'हरकत नाही' अशी प्रमाणपत्र दिल्यास युनिट 1 मधून अधिक 300 मेगावॅट खरेदी करण्याच्या प्रस्तावाला सशर्त मंजुरी दिली आहे. उक्त आदेशात, सन्माननीय आयोगाने महाराष्ट्र इनएसटीएसचा एक भाग होणाऱ्या व्हीआयपीएल द्वारे विकसित केलेली निगडित प्रसारण व्यवस्था वेगळी करण्याचा निर्देश दिला आहे. त्यानुसार प्रसारण व्यवस्थेसाठी एका प्रसारण परवान्यासाठी अर्ज करण्यास सांगितले, उक्त आदेश हा दिनांक 13 सप्टेंबर 2013 दिनांकाच्या सन 2007च्या केस क्र. 34 मधील आदेशाला अनुसरून होता. व्हीआयपीएलने त्यानंतर एमआयडीसीकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतर युनिट 1 मधून 300 मेगावॅट खरेदी करण्यासाठी पीपीएने मंजूरी मिळविण्याकरता आणखी एक 2013च्या केस क्र. 76 हा पुरवणी अर्ज सादर केला. सन्माननीय आयोगाने 17 जुलै 2013 च्या आदेशान्वये पीपीएला आणि दोन्ही युनिटकरताच्या स्वतंत्र पीपीएला एकत्रित करून संकलित कराराला मंजूरी दिली. याशिवाय, व्हीआयपीएलने प्रसारण मालमत्तेच्या भांडवली खर्चाला वेगळे करून व्हीआयपीएल–जीच्या तात्पुरत्या दर निर्धारणाकरता आणखी एक अर्ज सादर केला.

याचिकेच्या अर्जदाराने व्हीआयपीएल–टी प्रसारण उद्योगाकरता फेब्रुवारी 20, 2014 रोजी दिनांकित, 2014 चे याचिका क्र. 60 दाखल केली, त्यांत त्यांनी विद्युत कायदा (ईए), 2003, एमईआरसी (ट्रान्समिशन परवाना अटी) विनियम, 2004 आणि एमईआरसी (मल्टी वर्ष दर (एमवायटी)) विनियम, 2011 चे कलम 14, 61 व 62 उद्धृत केले.

तांत्रिक प्रमाणीकरण सत्र (टीवीएस) 15 एप्रिल, 2014 रोजी आयोजित करण्यात आले होते. कामकाजाच्या दरम्यान, सन्माननीय आयोगाने व्हीआयपीएलला मंजुरीसाठी परवाना आणि दुसरे म्हणजे एमईआरसी (एमवायटी) विनियम, 2011 नुसार एआरआरला मंजूरी ह्या दोन विषयातील याचिका वेगवेगळ्या करायला संगितले. त्यानुसार, सन्माननीय आयोगाने फेब्रुवारी 20, 2014 ला न्यायालयात दाखल केलेली याचिका ही परवानाधारक याचिका म्हणून विचारात घेतली आणि त्यानुसार याचिकेत बदल करण्याचा निर्देश देऊन सुनावणी पूर्ण केली. त्या अनुषंगाने, व्हीआयपीएल 25 एप्रिल, 2014 रोजी ट्रान्समिशन परवाना देण्यास परवानगीकरता एक सुधारित अर्ज सादर केला.

ईए, 2003 च्या कलम 14 अंतर्गत आयोगातील निहित शक्ती कार्यान्वित करताना, आयोगाने आदेश दिनांक 5 जानेवारी, 2015 नुसार व्हीआयपीएल–टीला आदेशाच्या तारखेपासून 25 वर्षाच्या कालावधीसाठी प्रसारण परवाना प्रदान केला, विकल्प 2 च्या अंतर्गत आणि 2006 मध्ये सुधारित केलेल्या एमईआरसी (ट्रान्समिशन परवाना अटी) विनियम, 2004 नुसार. आयोगाने याचिका अर्जदाराला असेही सांगितले की या आदेशाच्या 60 दिवसांच्या आत लागू नियमानुसार त्याने आयोगाला एआरआर सादरीकरण केले पाहिजे.

सन्माननीय आयोगाच्या निर्देशानुसार, 18 फेब्रू. 2015 रोजी आर्थिक वर्ष 14–15 ते आर्थिक वर्ष 15–16 या कालावधीकरता भांडवल खर्च आणि एकत्रित महसूल आवश्यकतेच्या निर्धारणाच्या मंजूरीकरता ('एआरआर') व्हीआयपीएल–टीने याचिका सादर केली. सन्माननीय आयोगाने डेटा–अंतर याबाबत स्पष्टीकरण मागवले पहा ई–मेल डेटा–अंतर सेट–1 व 2 अनुक्रमे दिनांक 2 जुलै, 2015 व 7 जुलै 2015, ज्याला व्हीआयपीएल–टीने योग्य उत्तर पाठवले पहा सादरीकरण संदर्भ क्र.: व्हीआयपीएल/एमयूएम/2015–16/एमईआरसी/व्हीआयपीएल–टी/1 दिनांक 17 जुलै 2015 व संदर्भ क्र.: व्हीआयपीएल/एमयूएम/2015–16/एमईआरसी/व्हीआयपीएल–टी/2 दिनांक 20 जुलै 2015. डेटामधील अंतराला दिलेली उत्तरे परिशिष्ट 12 मध्ये आहेत.

तांत्रिक प्रमाणीकरण सत्र (टीव्हीएस) 21 जुलै, 2015 रोजी आयोजित करण्यात आले होते. कामकाजाच्या दरम्यान, सन्माननीय आयोगाने व्हीआयपीएलला निर्देश दिला की आयोगाने दाखवलेल्या डेटा–अंतराच्या अनुपालनाची खात्री करावी आणि व्हीआयपीएल–टीने सादर केलेल्या प्रतिसादाच्या पडताळणीवर आधारित, ही याचिका दाखल करून घेण्याच्या आधी कोणती पुढील पावले उचलायला हवीत याचा आयोग निर्णय घेईल.

बी.1 याचिकेचा दृष्टीकोन व उद्देश्य

व्हीआयपीएल–टीने आर्थिक वर्ष 14–15 ते आर्थिक वर्ष 15–16 या कालावधीकरता भांडवल खर्च आणि एकत्रित महसूल आवश्यकतेच्या निर्धारणाच्या मंजूरीकरता ('एआरआर') सुधारित अर्ज सादर केला, ज्यात एमईआरसी (एमवायटी) विनियम, 2011 च्या त्या त्या तरतुदींच्या मार्गदर्शनानुसार बांधलेले अंदाज (प्रोजेक्शन्स) आहेत.

सी. 1 भांडवल खर्च

व्हीआयपीएल–टीने व्हीआयपीएल–जी या निर्मिती स्टेशनपासून ते बुटीबोरी स्थळातील (म्हणजे बुटीबोरी श्र व बुटीबोरी श्रश्रश्र) येथील एमएसईटीसीएलच्या त्या त्या उपस्टेशन्स पर्यंतच्या इंटरकनेक्टींग प्रसारण व्यवस्थेची निर्मिती केली आहे. प्रसारण मालमत्ता याकरता निश्चित केलेला भांडवल खर्च रुपये 28.64 कोटी आहे.

व्हीआयपीएलने सादर केले आहे प्रसारण व्यवस्था ही एक स्वतंत्र प्रतिष्ठापन (इन्स्टॉलेशन) म्हणून विकसित करण्याची कल्पना केली नव्हती आणि संपूर्ण निर्मिती स्टेशनचा एक भाग म्हणून विचारात घेतले जाण्याची कल्पना केली होती. या व्यवस्थेमुळे, प्रसारणाच्या मालमत्तेचे भांडवलीकरण हे निर्मितीच्या मालमत्तेशी जोडले गेले होते कारण प्रसारणाच्या मालमत्तेचे भांडवलीकरण याचे एक कार्यान्वियन आणि निर्मिती मालमत्तेचे भांडवलीकरण हे प्रसार मालमत्ता भांडवल याची एक पूर्व–आवश्यकता होती. आर्थिक वर्ष 2013–14 साठी व्हीआयपीएल ऑडिट खाती योजना 1 मध्ये भांडवलीकरण दर्शविण्याचे हे कारण आहे, जरी विद्युतचार्ज केली गेली होती आणि त्याची 29 जून 2012 मध्ये चाचणी घेतली होती (आणि म्हणून वापरावयास तयार होते). नंतर, याआधी वर सांगितल्यानुसार, प्रसारण योजना 2 सुद्धा विद्युतचार्ज केली गेली होती आणि त्याची 13 जून 2013 मध्ये चाचणी घेतली होती आणि त्याचे 2013–14च्या दरम्यान व्हीआयपीएलच्या अकाउंट पुस्तकात भांडवलीकरण केले गेले होते.

तथापि, सन्माननीय आयोगाने त्यांच्या 2013 च्या केस क्र. 2 मधील दिनांक फेब्रुवारी 2013च्या आदेशानुसार निकास (इव्हॅक्युएशन) लाईन्सना निर्मिती प्रकल्पापासून वेगळे करण्याचा आणि त्यांना इनएसटीएस भाग समजण्याचा निर्देश दिला होता. तथापि, जर इनएसटीएस प्रणालीचा एक भाग म्हणून प्रसारण मालमत्ता हे स्टँड अलोन तत्त्वावर विचारात घेतले जाणार असेल तर, दोन्ही प्रसारण लाइन्स यांचे नियामकतेच्या हेतूने ह्या कार्यान्वित होण्याच्या त्या त्या तारखांना भांडवलीकरण केले गेल्याचे विचारत घ्यायला हवे.

विद्युत निरीक्षकाने 29 जून 2012 आणि 13 जून 2013 रोजी लाइन्सची चाचणी घेतली आणि त्याना विद्युत चार्ज केले (पुरवणी 1 मध्ये विद्युत निरीक्षकाचे प्रमाणपत्र जोडले आहे). निर्मिती युनिट्सची सीओडी तारीख व प्रसारण लाईन्सपासून पॉवर निकासाच्या प्रत्यक्ष प्रारंभाची तारीख यांचा सारांश पुढे दिला आहे:

**ई १: युनिट्स निर्मितीच्या सीओडीच्या आणि प्रसारण लाइन्सच्या तारखांचा सारांश**

| युनिट्स | तारखा |
|---|---|
| युनिट्स निर्मिती– सीओडी | |
| युनिट १ | ४ एप्रिल, २०१३ |
| युनिट २ | २८ मार्च, २०१४ |
| प्रसारण लाईन्स वास्तविक निकास प्रारंभाची तारीख | |
| प्रसारण लाईन १ व २ | २९ जून, २०१२ |
| प्रसारण लाईन ३ व ४ | १३ जून, २०१३ |

प्रसारण लाईन्सच्या कार्यान्वयाच्या दिनांकाच्या आधारावर भांडवल खर्चाच्या मंजूरीकरता – व्हीआयपीएल–टीने सादर केले आहे की प्रस्तुत दाखला हा सन्माननीय आयोगाच्या दिनांक 25 मे, 2011 च्या 2010 च्या केस क्र. 97 च्या आदेशानुसार आहे.

त्याशिवाय व्हीआयपीएलने असे सादर केले आहे की ह्या प्रकल्पाला संपूर्ण पॉवर स्टेशनचा एक भाग म्हणून निधी दिला गेला आहे, प्रसारण मालमत्तेच्या निर्मितीसाठी निश्चित केलेल्या निधीसाठी वेगवेगळ्या केलेल्या स्रोताच्या अनुसार निधी दिला जाणार नाही. तथापि, प्रकल्पाच्या व्याजदराच्या हेतूकरिता, याचिका अर्जदाराने सादर केले आहे की व्हीआयपीएल प्रकल्पासाठी वापरलेल्या रुपयातील कर्जावरील व्याजदर हा प्रसारण मालमत्तेच्या निर्मितीसाठी विचारात घेतला जावा. प्रकल्पाच्या कार्यान्वित होण्याच्या तारखेनुसार मालमत्तेचे वास्तविक भांडवलीकरण हे खालील कोष्टकात दिले आहे:

**ई २: प्रसारण परवानाधारकाच्या भांडवलीकरणाकरता (रु को. मध्ये)**

| आर्थिकवर्ष १२–१३ वास्तविक | आर्थिकवर्ष १३–१४ वास्तविक | आर्थिकवर्ष १४–१५ | आर्थिकवर्ष १५–१६ | एकूण |
|---|---|---|---|---|
| ७.२७ | २१.३७ | – | – | २८.६४ |

डी.1 आर्थिक वर्ष 14–15 व आर्थिक वर्ष 15–16 करताच्या एआरआरसाठी विचाराधीन भांडवल खर्च

वर स्पष्ट केल्यानुसार, प्रसारण प्रणालीशी जोडलेली निर्मिती स्टेशन्स ही एक प्रकल्प म्हणून विचारात घेतली गेली आहेत, म्हणून या दोन घटकांना निधी पुरवणे आणि कॅपेक्स हे एक एकेरी प्रकल्प म्हणून विचारात घेऊन पूर्ण केली गेली आहेत. नंतर, जेव्हा सन्माननीय आयोगाने दोन्ही मालमत्तेच्या घटकांना वेगळे करवयाला आणि स्वतंत्र याचिका दाखल करायला सांगितले तेव्हा, व्हीआयपीएल–टीने तेच अनुसरले.

जरी प्रसारण लाइन्स बऱ्याच अगोदर म्हणजे 29 जून 2012 व 13 जून, 2013ला कार्यान्वित झाल्या तरी – व्हीआयपीएल–टी हे 1 एप्रिलच्या 2014 पासून एआरआर मागत आहेत, कारण पॉवर पुरवठा करण्यासाठी बुटीबोरी पॉवर स्टेशनकरताचा या तारखेपासून पीपीए सुरु होत आहे. ही तारीख आहे की जेव्हा प्रसारण लाइन्समधून प्रत्यक्ष पॉवर पुरवठा सुरु होत आहे. यानंतर, याचिका अर्जदाराने 31 मार्च, 2014 रोजी आर्थिक वर्ष 2014–15 आणि आर्थिक वर्ष 2015–16 चा निश्चित करण्याकरता प्रकल्पाचा अवमूल्यित खर्च विचारात घेतला आहे.

त्या त्या योजनांच्या सीओडी पासून ते 31 मार्च, 2014 पर्यंतचा मालमत्तेवरील घसारा हा 1.41 कोटी एवढा निघाला आहे. म्हणून एआरआर निश्चित करण्याकरता याचिका अर्जदाराने ठरवलेली पॉवर स्टेशन्सच्या मालमत्तेची एकंदरीत किंमत ही 27.22 कोटी (रु. 28.64 कोटी – रु. 1.41 कोटी).

ई.1 1 एप्रिल, 2014 रोजी प्रकल्पाच्या खर्चाचा निधी प्रदानाचे प्रारुप

व्हीआयपीएल–टी हे विनियम 2011 मधील एमवायटी नियमन 30 नुसार एकूण भांडवली खर्चासाठी 70:30 असे कर्ज– इक्विटी प्रमाण प्रस्तावित करत आहे. एक संपूर्ण व्हीआयपीएल म्हणून वास्तविक भांडवल संरचना ही सुद्धा 70:301आहे आणि म्हणून निर्मिति आणि प्रसारण ह्या दोन्ही भागां साठी कर्ज व इक्विटी उघडण्याचे निश्चित करण्याच्या उद्देशाने एकच भांडवल संरचना वापरता येणार नाही. कर्ज व इक्विटीचे तपशील जे एआरआर निश्चित करण्याकरता विचारात घेतले जातात ते खालील कोष्टकात दिले आहेत:

**ई ३: निधी प्रदानाचा स्रोत**

| तपशील | रक्कम (रु. कोटी) |
|---|---|
| हार्ड खर्च | १८.६९ |
| पर्यवेक्षणाचे मूल्य | ५.७५ |
| प्रचालन–पूर्व खर्च | १.४५ |
| आयडीसी व वित्त पुरवण्याचे मूल्य | २.७५ |
| आयडीसी धरून प्रकल्पाचा खर्च | २८.६४ |
| कमी: लेखापरिक्षित जमा झालेला घसारा आर्थिक वर्ष १२–१३ व आर्थिक वर्ष १३–१४ करता | १.४११ |
| एप्रिल, २०१४ रोजी कॅपेक्स | २७.२२ |
| इक्विटी (३०%) | ८.१७ |
| कर्ज (७०%) | १९.०५ |
| व्याजदर | १४% |

एआरआर निर्धारणाकरता याचिका अर्जदाराने विचारात घेतले जाणारे मालमत्तेचे एकंदर मूल्य हे पूर्वी दिल्यानुसार रु. 27.22 कोटी आहे व्हीआयपीएल–टीने एआरआरच्या गणनेच्या हेतूसाठी डी/ई 70:30 गुणोत्तर विचारात घेतले आहे. त्यानुसार, स्टेशनच्या भांडवल खर्चाच्या डब्ल्यूडीव्ही मूल्यावर आधारित 1 एप्रिल, 2014 रोजी असलेले एकूण प्रमाणक कर्ज आणि इक्विटी घटक वर दिलेले आहेत.

एफ.1 वार्षिक महसूल आवश्यकता

व्हीआयपीएल–टीने प्रसारण मालमत्तेच्या वास्तविक भांडवल खर्चाच्या आधारावर एआरआरच्या घटकांचा अंदाज बांधला आहे.

ए. प्रचालन आणि देखभाल खर्च: 2ऱ्या एमवायटी नियंत्रण कालावधी करता येणारे आर्थिक वर्ष 2014–15 आणि आर्थिक वर्ष 2015–16 पासूनचे प्रचालन आणि देखभाल खर्च खालील कोष्टकात दिले आहेत

**ई ४: प्रचालन आणि देखभाल खर्च (रु. कोटी मध्ये)**

| प्रचालन आणि देखभाल खर्च | यूओएम | आर्थिकवर्ष २०१४–१५ प्रमाणक | आर्थिकवर्ष २०१५–१६ प्रमाणक |
|---|---|---|---|
| | रु. कोटी | ०.६६ | ०.६९ |

[1]कृपया सन २०१३ च्या केस क्र ९१ दिनांक १७ जानेवारी २०१४ च्या सन्माननीय आयोगाच्या आदेशाचा विभाग ४.३.४ पहा.

बी. घसाराः घसारा चे परिकलन हे एमईआरसी एमवायटी नियमन 2011 च्या घसारा दरानुसार केले गेलेले आहे, आर्थिक वर्ष 2014–15 आणि आर्थिक वर्ष 2015–16 पासुन दूसऱ्या एमवायटी नियंत्रण कालावधीसाठीचा घसारा हा खालील तक्त्यामध्ये पुरविला गेला आहेः

**ई ५: घसारा (रू कोटी )**

| तपशील | यूओएम | आर्थिकवर्ष २०१४–१५ मानक | आर्थिकवर्ष २०१५ –१६ मानक |
|---|---|---|---|
| घसारा | रुपये कोटी | १.४९ | १.४९ |

सी. कर्ज भांडवल व्याज: व्हीआयपीएल प्रकल्पाच्या कर्ज घेण्याच्या रकमेवर लागू व्याज दरावर आधारित कर्जाच्या दराचा व्हीआयपीएल–टीने अंदाज बाधला आहे आणि त्याचप्रमाणे दुसऱ्या एमवायटीलच्या नियंत्रण कालावधीसाठीचा दर खाली दर्शविल्याप्रमाणे असेल:

**ई ६: कर्ज भांडवल व्याज (रू कोटी )**

| तपशील | यूओएम | आर्थिकवर्ष २०१४–१५ अंदाजे | आर्थिकवर्ष २०१५ –१६ अंदाजे |
|---|---|---|---|
| | रुपये कोटी | २.५६ | २.१० |

डी. खेळते भांडवल व्याज: लागू एसबीआय आगाऊ दर विचारात घेऊन आणि एमईआरसी एमवायटी नियमनांच्या अनुसार खेळत्या भांडवलावरील दराचा व्हीआयपीएल–टीने अंदाज बांधला आहे:

**ई ७: खेळते भांडवल व्याज (रू कोटी)**

| तपशील | यूओएम | आर्थिकवर्ष २०१४–१५ तरतूद | आर्थिकवर्ष २०१५–१६ अंदाजे |
|---|---|---|---|
| | रुपये कोटी | ०.१३ | ०.१३ |

**ई ८: आकस्मिकसाठा योगदान (रू कोटी)**

| तपशील | यूओएम | आर्थिकवर्ष २०१४-१५ अंदाजे | आर्थिकवर्ष २०१५ -१६ अंदाजे |
|---|---|---|---|
| आकस्मिक राखीव | रुपये कोटी | ०.१४ | ०.१४ |

एफ. इक्विटी वर परत जा: – एमवाटी विनियम, 2011 च्या खालील सारणीमध्ये तरतुदी आधारे नियंत्रण कालावधीसाठी आरओईचा अंदाज व्हीआयपीएल–टीने बांधला आहे:

**ई ९: इक्विटी वर परतावा (रू कोटी )**

| तपशील | युओएम | आर्थिकवर्ष २०१४-१५ प्रमाणक | आर्थिकवर्ष २०१५-१६ प्रमाणक |
|---|---|---|---|
| सरासरी इक्विटी शिल्लक वर आरओई @ १५.५% | रुपये कोटी | १.२७ | १.२७ |

जी. आयकर: – व्यवसाय कार्याच्या नियंत्रणासाठी आयकर भत्याच्या अभिक्रियेशी संबंधित सन्माननीय एटीईच्या मतानुसार त्याच्या अपील क्र. 104/2012, 138/2012 आणि 139/2012 मधील मतावर आधारित आयकराचा अंदाज व्हीआयपीएल–टीने बांधला आहे. व्हीआयपीएल–टीने असे सादरीकरण केले आहे की सन्माननीय एटीईच्या नमूद केलेल्या कायद्यानुसार, प्रत्येक नियंत्रित व्यवसाय विभागाची हाताळणी संबंधित व्यवसायाच्या नफ्यानुसार स्वतंत्र व्यवसायानुसार करणे आवश्यक आहे. एकूण कर विचारात घेता त्यानुसार खालील टेबलामध्ये अंदाज दर्शविण्यात आला आहे:

**ई १०: आयकर (रु कोटी )**

| तपशील | युओएम | आर्थिकवर्ष २०१४ -१५ मानक | आर्थिकवर्ष २०१५ -१६ मानक |
|---|---|---|---|
| आयकर दायित्व | रुपये कोटी | ०.३४ | ०.३४ |

एच. दराशिवाय उत्पन्न आणि इतर व्यवसाय उत्पन्न: व्हीआयपीएल–टीसाठी आगामी कालावधीमध्ये इतर व्यवसाय संधी व्हीआयपीएल–टीने विचारात घेतलेली नाही आणि त्यामुळे इतर व्यवसाय मधील अंदाजे उत्पन्न काहीच नसेल. परंतु, दराशिवाय उत्पन्नासाठी, आकस्मिक साठ्यावर जमा करण्याचा अंदाजे दर हा खालील टेबलमध्ये दिला आहे.

**ई ११: दराशिवाय उत्पन्न (रू कोटी )**

| तपशील | युओएम | आर्थिकवर्ष २०१४ -१५ तरतुद | आर्थिकवर्ष २०१५ -१६ अंदाजे |
|---|---|---|---|
| दराशिवाय उत्पन्न | रुपये कोटी | ०.०१ | ०.०२ |

आय. एकूण महसूल आवश्यकता: वरील बाबी, आर्थिक वर्ष 2014–15 ते आर्थिक वर्ष 2015–16 दुसऱ्या नियंत्रण कालावधीत आर्थिक वर्षासाठी व्हीआयपीएल–टीची एकूण महसूल आवश्यकता खालील टेबल मध्ये देण्यात आली आहे:

**ई १२: आर्थिक वर्ष १४–१५ आणि आर्थिक वर्ष १५–१६ साठी एकूण महसूल आवश्यकता ( रु. कोटी)**

| तपशील | एमवायटी कालावधी | |
|---|---|---|
| | आर्थिक वर्ष १४–१५ | आर्थिक वर्ष १५–१६ |
| ऑपरेशन व देखभाल खर्च | ०.६६ | ०.६९ |
| घसारा खर्च | १.४९ | १.४९ |
| दीर्घकालीन कर्ज भांडवल व्याज | २.५६ | २.१० |
| खेळते भांडवल आणि ग्राहक सुरक्षा ठेवींवरील व्याज | ०.१३ | ०.१३ |
| इतर खर्च | – | – |
| आयकर (आर्थिक वर्ष १५, आर्थिक वर्ष १६) | ०.३४ | ०.३४ |
| आकस्मिक साठा योगदान | ०.१४ | ०.१४ |
| एकूण महसुली खर्च | ५.३२ | ४.८९ |
| इक्विटी कॅपिटल वर परत | १.२७ | १.२७ |
| एकूण महसूल आवश्यकता | ६.५९ | ६.१६ |
| कमी: दराशिवाय उत्पन्न | ०.०१ | ०.०२ |
| कमी: इतर व्यवसाय उत्पन्न | – | – |
| ट्रान्समिशन दरापासून एकूण महसूल आवश्यकता | ६.५८ | ६.१४ |

व्हीआयपीएल–टी सादर करत आहे की, व्हीआयपीएल–टी ची हस्तांतरण व्यवस्था ही इनएसटीएस नेटवर्कचा भाग असल्याने एमवायटी नियमन 2011 च्या नियम 64 अनुसार हस्तांतरणाच्या शुल्कांवरील पुनर्लाभ मासिक पद्धतीने हे आवश्यक आहे.